विटे येथील मे.दिवाणी न्यायाधिशसो 'क' स्तर यांचे न्यायालयात

रे.दि.मु.नं. १८३ / २०२५

केदारी बाळकृष्ण सुर्यवंशी — वादी

विरूध्द्

प्रतिक पांडुरंग सुर्यवंशी — प्रतिवादी

दावा रिप्रेझेंटेटीव्ह सुट (प्रतिनीधी दावा) दाखल करून घेणेसाठी परवानगी मिळणेसाठीचे अर्जाचे पुष्ठयार्थ ॲफिडेव्हीट

यात मी सदरील वादी **केदारी बाळकृष्ण सुर्यवंशी,** वय वर्षे : ५२, व्यवसाय : शेती, रा. विटा, सुर्यनगर, ता. खानापूर, जि. सांगली आज मुक्काम विटा सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की,

१९/०७/२०२५

१) वादीने सदरचा दावा प्रतिवादींचे विरूध्द् सदरचा दावा रिप्रेझेंटेटीव्ह सुट (प्रतिनीधी दावा) अशा स्वरूपाचा दावा म्हणून दाखल केलेला आहे. कसबे विटा, ता. खानापूर, जि. सांगली येथील जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :—

| **अ.नं.** | **रि.सर्व्हे नं.** | **क्षेत्र हे.आर.** | **आकार रू.—पै.** | **शेरा/हिस्सा** |
|---|---|---|---|---|
| १) | ७२/१/१ | ०—९१ | ०—४८ | संपूर्ण |

यास चतु:सिमा खालीलप्रमाणे :—

पूर्वेस — सर्वे नं. ७२/२ब/१/१ ची जमीन.

दक्षिणेस — गावठाण.

पश्चिमेस — सर्व्हे नं.७३ व ७४ ची मिळकत.

उत्तरेस — ओढा.

१५-७-२५
**Asstt.Supdt.(J)**
Civil Court Sr.Dn Vita

येणेप्रमाणे जमीन मिळकती, झाडझुड, तालबांधोरा, दगडमाती वगैरे तदंगभूत वस्तुसह व इजमेंटचे हक्कासह.

२) वर दावा कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही ग्रामस्थ मंडळाची मिळकत असून, अशा ग्रामस्थ मंडळाचेवतीने वादी यांचे पूर्वहक्कदार बापु मारूती होगले वगैरे ५ हे काम पहात होते. वादी प्रतिवादी हे सुर्यनगर (पूर्वीचे होगालवाडी) विटा येथील कायमचे रहिवाशी आहेत. सुर्यनगर येथे पूर्वीपासून गावगाडा चालत आलेला आहे. गावगाड्यामध्ये बापू मारूती होगले वगैरे लोक पंच म्हणून काम पाहत होते. गावस्तरावर न्यायनिवाडा करणे गावगाडा चालविणे गावातील सामाजीक गावातील सामाजीक व इतर वैयक्तीक स्तरावरील लोकांचे प्रश्न सोडविणे गावासाठी काम करणे वगैरे बाबी करीत होते. ग्रामस्थ मंडळीमध्ये १) बापू मारूती होगले, २) धोंडी दादू होगले ३) ज्ञानू भिवा होगले ४) ताया तुकाराम होगले ५) लखू आप्पा पाणसे हे लोक वंशपरंपरेने वर नमूद केलेप्रमाणे कार्य करीत होते.

३) ग्रामस्थ मंडळाची स्थापना ही गावाचे हित जोपासणेसाठी झालेली असून सर्वे नं.७२ पैकी २ एकर २० गुंठे क्षेत्र गावाचे सार्वजनीक वापरासाठी ठेवलेले आहे. ग्रामस्थ मंडळीपैकी पाचही लोक मयत आहेत. वादी यांना समाजकार्याची आवड आहे. पूर्वजांप्रमाणे वादी हे देखील गावातील लोकांच्या अडीअडचणी सोडविणेसाठी प्रयत्नशील असतात. वादी हे सामाजीक कार्य करीत असून ते समाजाचे हिताचा विचार करून सामाजीक प्रश्न सोडवित असतात.

४) दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचा कोणताही कसलाही हक्क हितसंबंध केंव्हाही नव्हता व नाही. प्रतिवादीनी अनाधिकाराने दावा

14-7-25
Asstt.Supdt.(J)
Civil Court Sr.Dn.Vita

मिळकतीमध्ये अतिक्रमण केलेले आहे. प्रतिवादींचे कथनानुसार प्रतिवादींची घरे दावा मिळकतीमध्ये नसून ती गावाठाणामध्ये आहेत. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींना कोणतेही अधिकार नाहीत. असे अधिकार नसताना ग्रामस्थ मंडळातील लोक मयत झालेचा गैरफायदा घेवून प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण केले आहे व दावा मिळकतीची मोजणी करून घेणेस प्रतिवादी टाळाटाळ करीत आहेत. बापु मारूती होगले हे दि.२९/११/१९९८ रोजी मयत झाले असुन, वादी हे बापु यांचे वारस आहेत. तसेच ग्रामस्थ मंडळीपैकी इतर चार लोकदेखील मयत असून त्यांचे वारस दाव्यावर सही करणेसाठी उपस्थीत राहू शकले नाहीत.

५) दावा मिळकत ही सुर्यनगर ग्रामस्थांची मिळकत असून, अशा मिळकतीपैकी काही क्षेत्र रयत शिक्षण संस्था, सातारा यांना दिलेले आहे. उर्वरीत मिळकतीमध्ये ग्रामस्थांची वहिवाट असून, अशी दावा मिळकत ही ग्रामस्थांचेकरीता म्हणुन ठेवलेली असून, अशा मिळकतीची देखभाल व अशी मिळकत सुस्थितीत ठेवणेसाठी ग्रामस्थ यांचेवतीने बापु मारूती होगले वगैरे पाच यांची नियुक्ती करणेत आलेली होती व आहे.

६) दावा मिळकत ही सार्वजनिक मिळकत असून, अशा मिळकतीची बापु मारूती होगले वगैरे पाच लोक व्यवस्था पहात होते व आहेत. अशी दावा मिळकत ही गावठाणचे लगत असलेने अशा मिळकतीमध्ये लगतचे धारक तसेच काही लोकांनी अतिक्रमण केले असलेचे बाब वादींचे नुकतेच निर्दशनास आले. म्हणुन वादी यांनी सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीची मोजणी होवुन असे अतिक्रमीत क्षेत्र दर्शविणेबाबत उपअधिक्षक भूमिअभिलेख कार्यालय, खानापूर विटा यांचे कार्यालयाकडे अर्ज करणेसाठी वादी गेले असता संबंधित कार्यालयाने वादी यांना बापु मारूती होगले वगैरे पाच या

11-2-25
Asstt.Supdt.(J)
Civil Court Sr.Dn.Vita

लोकांचे वारसांची नोंद झालेखेरीज अशी मोजणी करता येणार नाही असे सांगितले. तसेच अशा मिळकतीची खाजगी मोजणी करून घेवुन अतिक्रमण आहे अगर कसे या बाबीची शहानिशा करून घेवुन असे अतिक्रमण काढुन घेणेबाबत वादीने प्रतिवादी यांचेकडे दि. १३/०४/२०२५ रोजी विचारणा केली असता प्रतिवादी यांनी त्यास नकार दिला. म्हणुन वादीस सदरचा रिप्रेझेंटेटिव्ह सुट/प्रातिनीधीक दावा या मे.कोर्ट मजकूरी दाखल करणे भाग पडत आहे. प्रतिवादी यांचे सदरचे कृत्य पब्लीक अॅट लार्ज करीता हार्मफुल आहे. अशा वाद रस्त्यामध्ये अनेक लोकांचा इंटरेस्ट आहे. असा इंटरेस्ट प्रोटेक्ट करणेसाठी वादीने सदरचा प्रतिनीधी दावा दाखल केलेला आहे.

७) दावा मिळकतीमध्ये मौजे सुर्यनगर विटा येथील लोकांचा पब्लीक इंटरेस्ट आहे. वादी यांनी वाद विषय केलेली मिळकत ही सार्वजनीक वापराची असलेने अशा मिळकतीबाबत दाद मागताना सदरचा दावा हा रिप्रजेंटेटीव्ह सुट या सदराखाली येत आहे. दाव्याचे कामी मौजे सुर्यनगर विटा येथील लोकांचा पब्लीक इंटरेस्ट असलेने असा दावा रिप्रजेंटेटीव्ह सुट (प्रतिनीधीक दावा) म्हणून दाखल करणेस मे.कोर्टाची परवानगी मिळणे आवश्यक व जरूरीचे आहे. अशी परवानगी दिली गेलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही याउलट अशी परवानगी दिली गेली नाही तर मग मात्र वादीचे व मौजे सुर्यनगर विटा येथील लोकांचे कशानेही नभरूण येणारे फार मोठे नुकसान होणार आहे. व वादी व इतर लोकांना मल्टीप्लीसीटी ऑफ प्रोसीडींगला सामोरे जावे लागणार आहे.

८) तरी वादीची विनंती की:—

अ) वादीचा अर्ज मंजूर होणेत यावा.

ब) वादीस सदरचा दावा रिप्रजेंटेटीव्ह सुट (प्रतिनीधीक दावा) म्हणून दाखल करणेस मे.कोर्टाची परवानगी मिळावी.

Asstt.Supdt.(J)
Civil Court Sr.Dn.Vita

क) जरूरतर अर्ज दुरूस्तीस परवानगी असावी.

ड) इतर आणखी योग्य ते हुकूम वादीचे वतीने होणेत यावेत.

इ) येणेप्रमाणे वादीचेसारखा फैसला व्हावा. म्हणून केले हे ॲफिडेव्हीट.

विटा.

ता.१२/०६/२०२५

वादी

**व्हेरीफिकेशन**

यात मी सदरील वादी **केदारी बाळकृष्ण सुर्यवंशी**, वय वर्षे : ५२, व्यवसाय : शेती, रा. विटा, सुर्यनगर, ता. खानापूर, जि. सांगली आज मुक्काम विटा सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वर ॲफिडेव्हीट मध्ये नमुद केलेला संपूर्ण मजकुर माझे वैयक्तिक व विश्वसनीय माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन, तो तसा समजावुन घेवुन त्याखाली मी माझी सही केली आहे. ता.म. १२/०६/२०२५

विटा.

ता.१२/०६/२०२५

वादी

वादीस ओळखतो

Solemnly affirmed before me
by Shri Kedari Balkrishna Suryawanshi R/o Vita
who is identified before me
by Shri Adv. R. K. Suryawanshi
whom I Personally know
Dt 14/7/2025

14-7-25
Commissioner of Oath
Asstt.Superintendent
Civil/Criminal C...